OCT - Dec. - 2018


ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL


# AJANTA








Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - VI

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - VI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २९ | ग्रामीण साहित्याचे मुळ लोकसाहित्यात<br>**प्रा. डॉ. ज्ञानेश्वर को. गवते** | १४८-१५० |
| ३० | आदिवासी साहित्य समिक्षेची वाटचाल<br>**लोकडे सोनाली अशोकराव** | १५१-१५३ |
| ३१ | समिक्षा, संकल्पना, आणि स्वरुप<br>**प्रा. हर्षद सुरेश सोनवणे** | १५४-१५६ |
| ३२ | आजची कादंबरी समीक्षा<br>**रामचंद्र काळुंखे** | १५७-१६४ |
| ३३ | लोकसाहित्याची समीक्षा : एक अन्वयार्थ<br>**डॉ. नवनाथ गोरे** | १६५-१६८ |
| ३४ | मराठी चरित्रवाङ्मय समीक्षा: स्थिती आणि स्वरुप<br>**प्रा. शरद मोहन पाटील** | १६९-१७३ |
| ३५ | ऐतिहासिक समीक्षापध्दती<br>**विना रमेश गुलदेकर** | १७४-१७७ |
| ३६ | मराठी समीक्षा : संकल्पना आणि स्वरूप<br>**मनोज मुनेश्वर** | १७८-१८० |
| ३७ | साने गुरुजी यांच्या 'रामाचा शेला' या साहित्यकृतीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व चळवळीचा प्रभाव<br>**डॉ. ममता इंगोले**<br>**प्रा. जालिंदर सीताराम जाधव** | १८१-१८९ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३७. साने गुरुजी यांच्या 'रामाचा शेला' या साहित्यकृतीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व चळवळीचा प्रभाव

**डॉ. ममता इंगोले**
सहयोगी प्राध्यापक तथा भाषा विभाग प्रमुख, डॉ. एच. एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर, जि. अकोला.
**प्रा. जालिंदर सीताराम जाधव**
सहा. प्राध्यापक, पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ता. गुहागर, जि. रत्नागिरी.

**साने गुरुजी हे** गांधी विचारसरणीचे होते. साने गुरुजी जेंव्हा महाविद्यालयीन शिक्षण घेत होते तेंव्हा १९२० - २१ च्या दरम्यान गांधीजींच्या असहकार चळवळीने उग्र रुप धारण केले होते. गांधीजींच्या हाकेला स्मरुन अनेकांनी आपआपले व्यवसाय सोडून चळवळीत उडी घेतली होती. यावेळी साने गुरुजींनी महाविद्यालयाला रामराम ठोकला व घरी वडिलांना पत्र लिहून कळविले की, 'तुमचा एक मुलगा देशासाठी फकीर झाला असे समजा' अशा पध्दतीने साने गुरुजींनी आपले पुढील सर्व आयुष्य गांधीजींच्या विचारसरणीस वाहून घेतले.

याच काळात सामाजिक परिवर्तनासाठी कार्य करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांच्या चळवळीचे प्रमुख नेते, हिंदू समाजव्यवस्थेत अमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी सातत्याने झटणारे एक समाजसुधारक, समाजजीवनात वेळोवेळी निर्माण होणा-या प्रश्नांचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करुन त्यावर भाष्य करणारे एक व्यासंगी व निस्पृह विचारवंत आणि स्वतंत्र भारताच्या घटनेचे शिल्पकार म्हणून सर्वानाच परिचित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक कार्यासाठी अहोरात्र मेहनत घेवून विपूल असे लेखन केले आहे. त्याच बरोबर प्रत्यक्ष सामाजिक परिवर्तनासाठी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह / आंदोलन, नाशिक येथिल काळाराम मंदिर सत्याग्रह / आंदोलन, मनूस्मृती दहन, इ. कार्यही केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची दखल त्या काळातील म. गांधी व काँग्रेस चळवळ यांनाही घ्यावी लागली. पर्यायाने त्या काळातल्या लोकांचे जनमानस घडविण्यासाठी या दोन व्यक्तींचे कार्य उपयोगी पडलेले आहे. त्या काळातील जनमानसाचेच साने गुरुजी एक भाग असल्याने सहाजिकच त्यांच्या लेखनावरही या दोनही विचारवंतांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला असल्याची शक्यता आहे.

साने गुरुजी हे जाणिवेने आणि बांधिलकीने गांधीवादी लेखक असले तरी त्यांना त्या काळामध्ये सुरु असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा प्रभाव नाकारता आला नाही. लेखक, कलावंत हा समाजाच्या घटकांपैकी एक घटक असतो. तो बहुश्रृत असतो. त्यामूळेच गांधीवादी लेखक असूनही संवेदनशील साने गुरुजींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचा प्रभाव टाळता आला नसावा या भूमिकेतून प्रस्तूत संशोधन केलेले आहे.

**रामाचा शेला कादंबरीचा आशय**

साने गुरुजी लिखित 'रामाचा शेला' ही कादंबरी १९९ पृष्ठांची असून कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे यांनी प्र केलेली आहे. सदर कादंबरीच्या एकूण नऊ आवृत्त्या असून प्रथम आवृत्ती १९४४ मध्ये प्रकाशित झालेली आहे. शेला' ही कादंबरी एकूण तेरा भागात विभागलेली आहे. पहिल्या भागात कादंबरीतील नायिकेची तीच्या जन्म पित्याकडून (विश्वासराव) होणारा मानसिक छळ, तिचे करपून गेलेले मन, स्वत:लाच आपण विषवल्ली आहोत असा झालेला समज, आणि त्यातून आलेले कारुण्य, दु:ख अशी तिची करुण कथा. दुस-या भागात कादंबरीतील नायक व त्याची आई व्दारकाबाई यांच्या गरिबीची करुण कथा, तिस-या भागात सरला व उदय यांची प्रेमकहाणी, चौथ्या भाग जळगावी उदयची आई व्दारकाबाई हिचा मृत्यु होतो, ज्यामुळे उदयची स्मृती जावून तो भ्रमिष्टासारखा वागतो. पाचव्या भागात उदयपासून सरलाला दिवस गेलेले असल्याने त्यामूळे ती आपल्या बाबांना काहिही न सांगता घर सोडून जाते. पुढे पंढरपूर येथे जाऊन मुलाला जन्म देऊन बाळाला आश्रमात ठेऊन आपल्या प्रियकरास (उदय) शोधण्यासाठी निघते. सहाव्या भागात सरला व नलूची भेट होते. सरला - उदयची भेट व्हावी म्हणून नलू सरलाला त्याच्या मामाच्या गावाचा पत्ता मिळवून देते. व-हाडाकडे असलेलं पांढरकवडा या उदयच्या मामाच्या गावी सरला जाते. तिथे तिला समजते की, उदयची स्मृती आली आणि तो आपल्यालाच भेटण्यासाठी आपल्या बाबांच्या घरी पुणे येथे गेला आहे. म्हणून सरला पांढरकवडा गावावरुन तिच्या बाबांच्या घरी येते. तेंव्हा तिला विश्वासरावांकडून समजते की, तू मेलेली आहे आणि उदयनेही तूझ्यामागे जाऊन जीव दयावे असे आपण उदयला बोललो. म्हणून सरला परत उदयला शोधण्यासाठी बाहेर पडते. सातव्या भागात सरलेची फसवणूक करुन तिला कुंटणखाण्यात आणले जाते. तिथे ती काहि काळापर्यंत रामाचा भक्त असलेल्या रामभटजींचे मानसिक परिवर्तन करते. आणि आपले शील - चारित्र्य कठीण परिस्थितीत सांभाळते. त्याचवेळेस गब्बूशेट या व्यापा-याला आपल्या विचाराने त्याच्या मानसिकतेत परिवर्तन करुन त्याच्या मदतीनेच त्याचीच मानसकन्या होऊन सरला आपली कुंटणखाण्यातून सुटका करुन घेऊन गब्बूशेटच्या घरी त्याची मुलगी म्हणून जाते. गब्बूशेट सरलेला आपली गुरु मानतो. आठव्या भागात यादरम्यान उदय सरलाच्या वडीलांच्या घरी गेल्यावर विश्वासराव आणि उदय यांच्यात झालेला संवाद. आपले प्रेम हे पवित्र आहे त्याला नांव ठेऊ नये तसा आपणास कोणताच नैतिक अधिकार नाही असे उदय विश्वासरावांना बजावतो. आणि आपल्या जुन्या खोलीवर येतो. त्याची ती खोली भैयाने मधू नावाच्या एका विद्यार्थ्याला दिल्याचे त्याला कळते. त्याची भेटही होते. आपला आता जगण्यात काहीच अर्थ नाही असे म्हणून जेंव्हा उदय निघतो तेंव्हा उदयला त्याच्या मरणाच्या विचारांपासून मधू कसा परावृत्त करतो या विषयी सविस्तर हकीगत आहे. नवव्या भागात मुंबई वर्णाश्रम संघाचे अध्यक्ष गब्बूशेट यांची एकूणच विचारधारा वरकरणी प्रतिष्ठीत व्यापारी, रामभक्त, सोज्वळ दिसणारा मात्र मुळातच तसा नसलेला गब्बूशेट विषयी सविस्तर माहिती. भाग दहा मध्ये विश्वासरावांची दुसरी पत्नी रमाबाई व त्यांचे मुल यांचा मृत्यु झाल्यामुळे एकाकी पडलेल्या विश्वासरावांना आपल्या चूका कळतात. आपण सरलाशी कसे वागलो, उदयशी कसे वागलो या विषयी त्यांना पश्चाताप होतो. आणि ते आपली मुलगी सरला हिला शोधण्यासाठी पंढरपूरला जातात. तिथे त्यांना

सरलाचे बाळ भेटते. ते बाळच आपल जीवन जगण्याचा आधार म्हणून त्याला आपल्या सोबत घरी घेऊन येतात. अशा पध्दतीने आजोबा - नातू यांची भेट होते. विश्वासरावांच्या जीवनात पुन्हा जगण्याची नवीन उमेद त्यांचा नातू (प्रकाश) त्यांना कशी देतो या विषयी चित्रण येते. अकराव्या भागात नाशिक येथे रामनवमीस अस्पृश्य बंधू भगिनी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करणार आहे. त्यानिमित्ताने अस्पृश्यांचे पुढारी व अनुयायी नाशिक जिल्हयातील खेड्यापाड्यातून प्रचार व प्रसार करतात. त्यावेळेस वर्णाश्रम संघाने गब्बूशेट यांच्या अध्यक्षतेखाली सनातनींची सभा आयोजित केली असता गब्बूशेट स्वतः सरलाला त्या सभेत बोलावतो व आपले विचार मांडण्यास सांगतो. सनातनांच्या सभेत सरला धर्माविषयी, सनातनी लोकांच्या मनोवृत्तीविषयी त्यांच्या एकूणच स्वभावाविषयी आपला स्वानुभव व्यक्त करते. या परिषदेचा स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय या विचारांचा संदेश सर्वत्र गेला पाहिजे असे मत स्वतः या सभेचे अध्यक्ष गब्बूशेट आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त करतात. भाग बारा मध्ये रात्रीच्या होणा-या अस्पृश्यांच्या सभेमध्ये सेवकराम नावाचे स्वामी बोलणार आहे. या विषयी सर्वत्र बोलले जाते पण ते निश्चित कोण आहे याविषयी मात्र कोणालाही माहित नसते. आपणही अस्पृश्यांच्या परिषदेला जायला पाहिजे असे सरला गब्बूशेटला म्हणते. शेवटी सरला गब्बूशेटच्या सांगण्यावरुन गाडी घेवून एकटीच सभेला उपस्थित राहते. गाडीत बसूनच ती सेवकरामचे भाषण दूरवरुनच ऐकते. सेवकराम इतर दुसरा तिसरा कोणीही नसून आपलाच प्रियतम उदय आहे. हे सरला त्याच्या आवाजावरुनच ओळखते. आणि सरला उदयची भेट होते. भाग तेराव्यात उदय सरला पंढरपूरला येतात. आश्रमात लिहून ठेवलेल्या पत्रावरुन त्यांना समजते की, सरलेच्या बाबांनीच आपल्या मुलाला त्यांच्यासोबत घेवून गेले आहेत. पुढे ते दोघेही विश्वासरावांकडे पुण्याला येतात. विश्वासरावांना झालेला पश्चाताप त्यांना समजतो. विश्वासरावांनी आपल्या नातूचे नाव प्रकाश ठेवलेले असते. त्यालाही ते भेटतात. त्यांना आनंद होतो. यापुढे आपण ठाणे जिल्हयातील असलेल्या ग्रामीण भागातील आश्रमात, आदीवासी भागात काम करुन जीवन व्यथीत करण्याचा निर्णय घेतात. विश्वासरावही त्यांच्या बरोबर असतात म्हणून ते पुण्यातील विश्वासरावांचे घर विकून मुंबईला येतात. या दरम्यान नाशिक येथील मंदिर सत्याग्रह स्थगित करण्यात आलेला असतो. पुढे आश्रमातच एके दिवसी उदयला मृत्युपासून परावृत्त करणारा पुण्याच्या जुन्या खोलीतील त्याचा विद्यार्थी मित्र मधू येऊन भेटतो. आणि आपण या संस्थेच्या आश्रमाच्या कार्याला वाहून घेणार असल्याचे सांगतो. त्याचप्रमाणे उदय व सरलाची मैत्रिण नलूही त्यांना भेटायला येते त्यांच्यशी गप्पा मारते आणि त्यांची सर्व कथा ऐकूण घेते. आपण तुमच्या दोघांच्या कहाणीवर एक गोष्ट लिहिणार असल्याचे सांगते तेंव्हा त्या गोष्टीला 'रामाचा शेला' असे नाव दयावे म्हणून सरलाच नलूला सूचविते. असा कादंबरीचा आशय आहे.

**कादंबरीवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व चळवळीचा प्रभाव**

कादंबरीतील नायकाची आई व्दारकाबाई आपल्या मुलासाठी मालकीणबाई कडून अंगात घालण्यासाठी कोट आणते. आईने आणलेला कोट जेंव्हा उदय अंगात घालून शाळेत जातो. तेंव्हा मालकीणबाईचा मुलगा बंडू उदयकडे पाहून आपल्या मित्रांना म्हणतो की, "त्या उदयचा कोट बघा. बावळटासारखा दिसतो आहे. ..लग्नाचा कोट की काय?... अरे त्याच्या आईने वाढत्या अगांचा

शिवला असेल म्हणजे पुन्हा पुन्हा शिवायला नको. त्याच्या आईने मागितला असेल आणि या बावळटाने घातला अंगात हु पण स्वाभिमान कोठे आहे?''[१] यावर उदय बंडूला खूप मारतो. आईला म्हणतो मी हा कोट घालणार नाही. त्यावर उदयला मारते बंडूच्या आईची माफी मागायला लावते. पाया पडायला लावते परंतु उदय मात्र अगदी निश्चयाने म्हणतो की, '' वाटेल तितके मार मी माफी मागणार नाही. कोणाच्या पाया पडणार नाही....जीव गेला तरी नाही पडणार...तू कोट कशाला आण कशाला भीक मागितलीस? मी फाटका कोट का घालीत नव्हतो?.. आई पुन्हा माझ्यासाठी कुणाकडे काही मागु नको उदयचे असलेले हे बोल म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १७ सप्टेंबर १९२७ रोजी महाड येथील झालेल्या सभेत त्यांनी सोप्या भाषेत लोकांना सांगितले की, ''जो दुस-याला आपणापेक्षाही कमी समजतो त्याला आपण योग्य धडा घालून दिला पाहिजे की कोणा पेक्षाही कमी नाही.''[३] तसेच ता. दि. २९ जानेवारी १९३२ रोजी दामोदर हॉल, मुंबई येथे झालेल्या समारंभात बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले की, ''तुमच्या अंतःकरणात स्वाभिमानाचा व स्वातंत्र्याचा जो दीप तेवत आहे तो अधिक उज्ज्व करण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. तो पुन्हा कधीही विझता कामा नये. याची प्रत्येकाने तुम्ही खबरदारी घेतली पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वरील सर्व विचारांतून त्यांनी उभी केलेली स्वाभिमानाची चळवळ दिसते. त्याच प्रमाणे त्यांच्या वरील प्रकारच्या विधानांतून माणूस कोणत्याही धर्माचा, पंथाचा असो अथवा कितीही गरीब, श्रीमंत असो त्याने आपला स्वाभिमान जागृत ठेवला पाहीजे. स्वाभिमानाचे जीवन प्रत्येक व्यक्तिला चांगल्या प्रकारे जगता यावे. स्वाभिमान बाजारात कुठे विकत मिळत नाही. स्वाभिमानाशिवाय जीवन अगदी कांडीमोल असते. याची जाणीव जशी होते त्याच प्रमाणे कादंबरीतील उदयच्या वक्तव्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव दिसतो.

कादंबरीतील स्वामी सेवकराम जेंव्हा अस्पृश्यांच्या परिषदेस उपस्थित राहून आपल्या भाषणात म्हणतात की, ''तुम्ही आज जागृत झाला आहात. जो जागत है वो पावत है तुमचा उध्दार आता जवळ आहे. आपले नागरिकत्वाचे हक्क जिंकून घेण्यासाठी तुम्ही सत्याग्रहाचे शस्त्र हाती घेत आहात.. बंधूंनो, तुम्ही राममंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करणार आहात. ठीक आहे. परंतु मला आपले कधी कधी वाटते की मंदिरात शिरण्यासाठी कशाला धडपड? काय आहे त्या मंदिरात? तेथे आज देव नाही. तेथे पावित्र्य नाही. क्षेत्रस्थानातील मंदिरे म्हणजे घाण वाटते. तेथे दंभ, व्यभिचार यांचे साम्राज्य आहे. या मंदिरातून देव नाही. कशाला तेथे जाता? तुम्ही याहून थोर धर्म घ्या. मंदिरातील मूर्ती म्हणजे एक खूण आहे. ईश्वराची एरव्ही कल्पना करता येत नाही. म्हणून ती मूर्ती आपण स्थापित असतो. परंतु परमेश्वराने स्वतःच्या अनंत मूर्ती निर्मिल्या आहेत. हे पाहा आकाशातील अनंत तारे. हे तारे म्हणजे प्रभूच्या मूर्तीच आहेत.... बंधुंनो कशाला त्या चार भिंतीच्या मंदिरात जाता? हे पहा विश्वमंदिर या विशाल आकाशाच्या खाली कोठेही बसावे, क्षणभर डोळे मिटावे आणि त्या जगच्चालकाला प्रणाम करावा. उत्साहीत होऊन पुन्हा आपल्या कामाला लागावे.''[५]

या ठिकाणी सेवकराम यांचे विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मंदिर प्रवेशासाठीची असलेली सत्याग्रहाची भूमिका याचा विचार केला असता त्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाच्या प्रसंगी आपल्या जातबांधवांना उद्देशुन केलेल्या भाषणात म्हटले होते की, मंदिरातील काळयारामाचे तोंड पाहून आपण पावन किंवा अजरामर होणार नाही. तर आम्हीही इतरांप्रमाणे माणसं आहोत. इतरांप्रमाणे आम्हालाही मंदिरात जाण्याचा हक्क, अधिकार आहे. सेवकरामच्या एकूणच सर्व विचारांतून

ज्या धर्मात माणुसकीने जवळ घेतले जात नाही त्या धर्माच्या नावाने शंख करीत रडण्यापेक्षा ज्या धर्मात, माणुसकी, शील, चारित्र्य, संघटना, शिस्त, सौजन्य यांचा सर्वव्यापी लाभ संपादन करता येईल असा बौध्द धर्माचा डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी आपल्या लाखो अनुयायांसोबत कोणत्याही प्रकारचे अमिष न दाखविता केलेला स्वीकार. बौध्दधर्म स्वीकारुन न भूतो न भविष्यतो अशी रक्तहीन केलेली क्रांती, सर्व मानव एक आहे. असा सांगितलेला संदेश. हेच उदयच्या विचारातून व्यक्त होते.

सरला स्पृश्यांच्या परिषदेत भाषण करण्यास सुरवात करते त्यावेळी आपल्या भाषणात म्हणते की, ''हिंदुधर्मातील स्त्रियांची स्थिती पाहा. त्या केवळ असहाय्य अबला आहेत. मुलींची लग्ने कशी होतात ती पाहा. मुलींचे एखाद्या तरुणावर प्रेम असले व त्या तरुणाचे तिच्यावर असले तर आईबापांचा धर्म आहे की त्या प्रेमाला आशीर्वाद द्यावा. परंतु असे नाही.... बालविधवांची स्थिती तर त्याहून अगदी बिकट आहे. त्यांना बालविधवांचा पुनर्विवाह व्हावा ही अधर्म्य गोष्ट वाटते. मी स्वत:चाच अनुभव सांगते. लग्न होऊन पंधरा दिवस नाही झाले तो माझा पती वारला. पांढ-या पायाची अवदसा म्हणून सासू सास-यांनी म्हटले, मला माहेरी पाठवण्यात आले. मी बाबांना एखादे वेळेस विचारी की सारे आयुष्य कसे कंठू? तर म्हणत, शिवलीलामृत वाच. शिवलीलामृतातील सीमंतिनीचा पती परत आला. माझा का येणार होता? माझ्या बाबांनी स्वत:उतारवयात लग्न केले. माझी आई निवर्तल्यावर काही दिवस ते एकटे राहिले. परंतु पुन्हा त्यांनी संसार मांडला. आपली बालविधवा मुलगी घरात डोळ्यांसमोर असता पुन्हा स्वत:चा संसार त्यांनी सुरु केला. आणि मी? मला का भावना नव्हत्या.''[६] हिंदू धर्मातील स्त्रियांना एक नियम व पुरुषांच्या बाबतीत एक नियम असा विषमतावादि असलेला दृष्टिकोन याचा प्रत्यय येतो. या विषमते बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात हिंदू धर्माविषयी व धर्मांतराविषयी अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत दि. ३१ मे १९३६ रोजी जे विचार मांडलेले आहे त्यात ते म्हणतात की, ''हिंदू धर्मात व्यक्तीला काही स्थान नाही. हिंदू धर्माची रचना वर्गाच्या कल्पनेवर केलेली आहे. एकाने दुस-याशी कसे वागावे याची शिकवन हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने दुस-या वर्गाशी कसे वागावे याची बंधने हिंदू धर्मात आहे. ज्या धर्मात व्यक्तिला प्राधान्य नाही तो धर्म मला स्वत:ला मान्य नाही. व्यक्तिचा विकांस हेच धर्माचे खरे ध्येय आहे......कायदयाने पुष्कळ हक्क दिले असतील पण समाज त्याचा उपयोग करुन देईल तरच ते हक्क आहेत असे म्हणता येईल. अस्पृश्यांनी चांगला पोशाख घालून हिंडावे असा हक्क कायदयाने दिला आहे. पण हिंदू समाज तसे कपडे वापरु देत नाही तर त्या हक्काचा काय उपयोग ?..... अस्पृश्य लोकांना कायदेशीर स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याची जास्त जरुरी आहे. सामाजिक स्वातंत्र्य जो पर्यंत तुम्हाला प्राप्त झाले नाही तो पर्यंत तुम्हाला कायदयाने कितीही स्वातंत्र्य दिले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही...... जितकी शारिरीक स्वातंत्र्याची आवश्यकता आहे, तितकीच मानसिक स्वातंत्र्याचीही अवश्यकता आहे. नुसत्या शारीरिक स्वातंत्र्याचा काही उपयोग नाही. महत्व आहे ते मानसिक स्वातंत्र्याला आहे...... मानसिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो मोकळा असून गुलाम आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जरी कैदी नसला तरी तो तुरुंगात आहे. ज्याचे मन स्वतंत्र नाही तो जिवंत असून मेला आहे. मनाचे स्वातंत्र्य ही जीवंतपणाची साक्ष आह.''[७] म्हणजेच ज्या धर्मात समता, प्रेम व आपुलकी नाही तो धर्म, धर्म नाही. हाच विचार प्रभावीपणे जानवतो.

दिसून येतो. सरलेने धर्माविषयी परखडपणे मांडलेल्या वरिल मतामध्येही हाच विचार प्रभावीपणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ''जो जो मनुष्य हिंदू धर्मात राहील त्या त्या माणसाला आपल्या विचारस्वातंत्र्याला तिलांजली दिल्याशिवाय गत्यंतर नाही. वागतांना त्याने वेदांप्रमाणे वागले पाहिजे. वेदांत तशी आज्ञा नसेल तर स्मृतीतील आज्ञेप्रमाणे वागले पाहिजे. स्मृतीत तशी आज्ञा नसेल तर महाजनांच्या पावलावर पाऊल ठेवून वागले पाहिजे. हिंदू धर्मात बुध्दीला, विचाराला प्राधान्य तर नाहीच नाही, पण वाव देखील नाही. हिंदूने कोणाची तरी गुलामगिरी केली पाहिजे. वेदाची गुलामगिरी केली पाहीजे, स्मृतीची कास धरली पाहिजे, अथवा महाजनांचे अनुकरण केले पाहीजे. विचारशक्तीचा त्याने मुळीच उपयोग करता कामा नये. जोपर्यंत तुम्ही हिंदू धर्मात आहात तोपर्यंत तुम्हाला विचारस्वातंत्र्य प्राप्त होऊ शकत नाही....या धर्माने तुमचे मानसिक स्वातंत्र्य हिरावून घेऊन तुम्हाला गुलाम केले आहे व याच धर्माने तुम्हाला व्यवहारात गुलामगिरीच्या दशेत आणून टाकले आहे. तुम्हाला जर स्वातंत्र्य हवे असेल तर तुम्हाला धर्मांतर केले पाहीजे.''[८] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या धर्मांतराच्या विचारांचा प्रभाव सरलाच्या वरील प्रकारच्या विचारातून प्रभाविपणे जाणवतो.

सनातनी विचारांचा, अंधश्रध्देवर विश्वास ठेवणारा, आपली मुलगी सरला हीस कधी प्रेमाच्या शब्दाने विचारपुस न करणारे विश्वासराव यांना जेंव्हा वैज्ञानिक पध्दतीने काही गोष्टी मनाला पटतात तेंव्हा स्वतःहून पश्चताप करतांना दिसतात व आपल्याच मनाशी अंतर्मुख होऊन विचार करतात आपल्या पत्नीला रमाला म्हणतात की, ''आपली पापे आपणाला छळीत आहे. त्यात सरलेचा काय दोष? जगात का मरण नाही? सगळ्यांकडे का सरला आहे? आणि सरला आज आठ महिने घरात नाही. तरी मरण आलेच ना? बाळाला सरलेचा हात लागू नये म्हणून आपण जपत होतो. तरी मृत्यूचा हात आलाच आपण मूर्ख आहोत. सरलेला उगीच बोललो. उगीच तिचे हृदय आपण दुखवले. तिला छळले. तिला रडवले. तिच्याजवळ प्रेमाचा शब्द कधी बोललो नाही. सरलेच्या आईला काय बरे वाटत असेल? आणि तुझी दोन मुले गेली. जणू सरला त्यांना घ्यायला नाही म्हणून गेली. सरला असती तर तुझी बाळे जाती ना. सरलेच्या पाठची तिची भावंडे का गेली? तिची आई का मेली? त्यात सरलेचा काय दोष? हा दोष कोणाच्या माथी मारायचाच असेल, मर तो माझ्या माथी मी का नये लादू? मीच करंटा, अभागी, असे मी का म्हणू नये? खरे ना?''[९] अश्या प्रकारे ते स्वतःच्या मनातील पश्चाताप व्यक्त करतात. विश्वासरावांमधील हा बदल म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत दि. ३१ मे १९३६ रोजी जे विचार मांडले, त्यावेळी त्यांनी आपल्या जातीबांधवांना उपदेश करतांना आपल्या भाषणाच्या अखेरीस म्हटले की, ''मी देखील बुध्दांच्याच शब्दांचा आश्रय करुन तुम्हाला असा निरोप देतो की, तुम्ही आपले आधार व्हा. तुम्हीच स्वतःच्या बुध्दिला शरण जा. दुस-या कोणाचाही उपदेश ऐकू नका. दुस-या कोणालाही वश होऊ नका. सत्याचा आधार घ्या. सत्यास शरण जा. दुस-या कशासही शरण जाऊ नका. हा भगवान बुध्दाचा उपदेश तुम्ही ध्यानात ठेवाल तर माझी खात्री आहे की तुमचा निर्णय चुकीचा होणार नाही.''[१०] सारांश स्वयंप्रकाशित व्हा. याच विचारांच्या प्रभावांमूळे विश्वासरावांना सत्याचे दर्शन होऊन आपली चूक उमगते. आपण आजपावेतो केलेल्या वर्तणूकीची भरपाई म्हणून आपले पुढील जीवन आश्रमात राहून आदीवासी लोकांच्यासाठी वाहून घेतात.

उदयलाही आपण जगून आता काहीच उपयोग नाही असे वाटू लागते पण त्याचा हा विचार त्याच्याच जुन्या खोलीत राहायला आलेला मधू नावाचा विद्यार्थी त्याला त्याच्या या विचारापासून परावृत्त करतो. त्यासाठी तो उदयला म्हणतो की ''उदय तुम्ही

नव - धर्माचा उदय करा. नव समाजरचनेचा उदय करा. हिदुस्थानात प्रचंड क्रांती पेटणार आहे. सारी विषमता, सारे दास्य, त्यात खाक होणार आहे. सारी क्षुद्रता त्यात होमिली जाणार आहे. तुमच्या डोळयांना नाही दिसत ती क्रांती? केवळ परकी सत्तेचीच तिच्यात आहुती पडणार आहे असे नाही. सर्व प्रकारचा जुलूम भस्म होणार आहे. या क्रांतीचे पाईक बना, अवदूत बना. आम्ही तुम्हांला येऊन मिळू नवजवान सारे उठू सर्वांगीण स्वातंत्र्याला निर्मू.....बहुजनसमाजात जायला हवे आहे. सेवेने त्यांच्यात शिरुन त्यांचा आत्मा जागृत करायला हवा आहे. सूर्याचे प्रकाशमय किरण येतात व मुक्या कळया फुलतात. त्याप्रमाणे सेवेचे, प्रेमाचे, सहानुभूतीचे, नवज्ञानाचे किरण घेऊन आपण परित्यक्त बंधूत जाऊ या. भिल्ल, कातकरी, गोंड, अनेक जातिजमाती रानावनांत पडलेल्या आहेत. कोण त्यांच्यात जातो, त्यांना उठवतो? ना वस्त्र, ना अन्न, ना ज्ञान, ना मान, त्यांना माणसे करायला कोणी जायचं? त्यांच्यात आश्रम कोणी काढायचे? मिशनरी त्यांच्यात जातात, परंतु आपणांमधून हजारो मिशनरी का नाही निघत?....समाजातील अन्याय, अज्ञान, जुलूम, दुःख, उपासमार, उनुदारता हे सारे पाहून रक्त सळसळले पाहिजे. नवी सृष्टी निर्माण करण्याच्या हिमतीने प्रखर तीव्रतेने कंबर बांधून ' दे घाव घे घाव ' करीत लढले पाहिजे.''[११]

कादंबरींतील मधू जेंव्हा उदयला वरिल प्रकारचा विचार सांगतो त्याचा असलेला हा विचार म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माला दिलेला नकार आणि बौध्दधर्माचा केलेला स्वीकार ही शस्त्रविरहित केलेली क्रांती. एकूणच बहुजन समाजाच्या हिताच्या दृष्टिने केलेला विचार अशीच जणू तो उदयच्या करवी क्रांती घडवून यावी ही अपेक्षा व्यक्त करतो. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेल्या बौध्दमय भारताचे स्वप्नच साक्षात पुर्ण होण्यासाठी उदयने त्या विचारांनी काम केले पाहिजे अशाच प्रकारची त्याला प्रेरणा देतो. या ठिकाणी मधूच्या विचारांतूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचाच प्रभाव असल्याचे आपणास प्रखरतेने जानवते.

**निष्कर्ष**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना आपल्या सर्वच कार्यातून व चळवळीतून स्वाभिमान आणि स्वातंत्र्याचा दीप कधीही विझू देऊ नका असा उपदेश दिलेला आहे. एकूणच काय तर बाबासाहेबांची सर्व चळवळ हि स्वाभिमानाची चळवळ होती हीच स्वाभिमानाची ज्योत कादंबरीतील नायक उदय यामध्ये दिसते. जेव्हा उदयची आई (द्वारकाबाई) त्याच्याकरीता तीच्या मालकाच्या मूलाचा जूना कोट घालायला आणते. त्यावर तो आईला बोलतो यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वाभिमानाचा व स्वातंत्र्याचा दीप कधीही विझता कामा नये, भाकरीपेक्षा स्वाभिमानाला अधिक महत्व आहे. हा जो काही महामंत्र /मूलमत्र सांगितलेला आहे हेच वैशिष्टे दिसते.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कार्यातून व चळवळीतून सांगितले आहे की, इतरांना आपल्या कार्यातून दाखविले पाहिजे आपण कोणाही पेक्षा कमी नाही. गुलाम म्हणून अपमान सहन करणार नाही. कादंबरीतील नायक उदय व नायिका सरला या व्यक्तीरेखा याच पध्दतीने संपूर्ण कादंबरीमध्ये वागतांना दिसतात. सर्व माणसे ही सारखी आहे. प्रत्येकास संपुर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. कोणीही कोणाही पेक्षा कमी नाही हे सिध्द करण्यासाठी प्रत्येकाला संधी मिळावी हे वैशिष्टे दिसते.

३) हिंदू धर्मात देव, आत्मा याला जागा आहे. पण मनुष्याच्या जीवनाला कोठे आहे ? या विषयी डॉ. बाबासाहेब आं हिंदू धर्माची मीमांसा करुन सातत्याने हिंदू धर्म हा मनुष्यासाठी नाही तर मनुष्य हा धर्मासाठी आहे. असे स्पष्ट केले आहे. धर्मात मनुष्याच्या जीवनाला अजिबात थारा नाही. कारण वर्णाश्रम धर्मानुसार त्या मनुष्याला जीवन जगावे लागते. म्हणून हिंदू आत्मा या सर्व गोष्टींना थारा आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वारंवार हिंदूधर्माची मीमांसा करुन स्पष्ट केले आहे. कादं नायिका सरलाचे बाबाही त्याच पध्दत्तीने आपणास कादंबरीत वावरतांना दिसतात. म्हणूनच धर्माने लादलेल्या गोष्टी ते मान्य क त्याच पध्दत्तीने ते वागतात. एवढेच काय तर कादंबरीत स्पृश्य बांधवांच्या, सनातनींच्या सभेतही हिंदू धर्म टिकून राहीला पा बुडता कामा नये. एवढेच काय तर त्यासाठी काहिही झाले तरी अस्पृश्य बांधवांना नाशिकच्या काळयारामाच्या मंदिरात प्रवेश कामा नये यासाठी सातत्याने प्रयत्न केला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्म याविषयी आपली भूमिका मांडतांना होते की, ज्या धर्मात समता, प्रेम व आपुलकी नाही तो धर्म, धर्म नव्हे. जो धर्म माणसांना माणूसकीने वागवीत नाही त्याला धर्म म्हणावे हे वैशिष्टे प्राप्त झाले आहे असे सांगता येते.

४) ख-या आणि श्रेष्ठ धर्माची पुन:स्थापना करण्याचे बिकट कार्य नव्या पिढीवर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नवी तरुण पिढीला दिलेला हा संदेश आहे. हाच संदेश कादंबरीतील नायक उदय याचा मित्र मधू हा उदयाला देतांना दिसतो. यामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण घेतलेल्या तरुणांनी सामाजिक कामामध्ये तन, मन व धन म्हणजेच बुध्दी, वेळ आणि पैसा सर्व देऊन सामाजिक कार्य केले पाहिजे किंबहूना त्यांचे ते कर्तव्य आहे हि भूमिका स्पष्ट होते.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काळाराम मंदिर प्रवेश या आंदोलनाच्या / सत्याग्रहाच्या संदर्भात जी एक भूमिका होती ती म्हणजे आम्हीही इतरांप्रमाणे माणसं आहोत. कादंबरीतील उदय अस्पृश्यांच्या सभेत भाषण करतांना म्हणतो की, देवदर्शनाशिवाय कोणी मरत नाही. देवालयात गेल्याने तुमचा उध्दार होणार नाही. ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका म्हणजे त्यांना अभिप्रेत असलेली अस्पृश्यबांधवांना हिंदू धर्मानुसार नाकरलेला मानवी हक्क आणि अधिकार या विषयी आंदोलन / सत्याग्रहाची जाणिव करुन देणारी आहे.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतराविषयी ठोस अशी भूमिका होती. ती म्हणजे धर्मांतराने अस्पृश्यांना समानतेचा हक्क प्राप्त होणार आहे. अस्पृश्यातील जातीभेद नष्ट व्हावित हा धर्मांतराचा एक हेतू आहे. धर्मान्तराने सर्व अल्पसंख्यांकांचे कल्याण होणार आहे. आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होण्यासाठीच धर्मातराची आवश्यकता आहे. बाबासाहेबांच्या या भूमिकेसारखीच भूमिका कादंबरीतील मधू व उदय / सेवकराम यांच्या संवादातून व्यक्त होतांना दिसते हे एक वैशिष्टे सांगता येते.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणातून स्त्रीयांना अनेकदा प्रबोधित करतांना म्हटले आहे की, भागिनींनो, समाजाला बट्टा लावणा-या धंद्यापासून मुक्त व्हा. स्त्रियांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. कादंबरीतील नायिका सरला वेश्या वस्तीमध्ये राहूनही आपले शील जपते. आपल्या संपूर्ण जीवनात कोणत्याही प्रकारे वाईट कृत्य करतांना दिसत नाही, उलट स्पृश्यांच्या परिषदेत आपल्या भाषणातून व वर्तनुकीतून उपस्थित स्त्रीयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीयांना सांगितलेल्या संदेशाचेच पालन करते. गब्बूशेठ सारख्या व्यक्तीला वाईट सवयी पासून परावृत्त करते आणि सामाजिक चळवळीच्या प्रवाहात आणते.

८) बौध्द धम्मा विषयी आपली मते मांडतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, माणसां-माणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्वानुसार जोडणा-या बौध्द धम्माचा मध्यवर्ती सिध्दांत समता आहे. अस्पृश्यांना बौध्द धम्माशिवाय दुसरा कोणताही अभ्युदयाचा मार्ग नाही. बुध्द तत्वज्ञानामुळे जग युध्दापासून दूर व शांततेच्या जवळ जाईल. हाच विचार कादंबरीतील सरलाचे बाबा विश्वासराव, उदय, सरला, मधू व गब्बूशेठ यांच्या एकूणच विचारातून व आचरणातून आलेला आहे.

९) कादंबरीतील सेवकराम व सरला दोघेही स्पृश्य व अस्पृश्य बांधवांना आापल्या बुध्दीच्या जोरावर सामाजिक समता, स्वातंत्र्य, बंधूता व सामाजिक न्याय या संदर्भातील आपले विचार पटवून देतात. यावरुन आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुध्दिवाद हाच असला पाहिजे. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक स्वातंत्र्या संदर्भात मांडला विचार यामध्ये एकसारखे पणा आलेला आहे.

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या चळवळीला एक निश्चित अशी दिशा दिली होती. हे कार्य करीत असतांना बाबासाहेबांनी अभ्यासपूर्वक असे आपले विचारही व्यक्त केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार आणि साने गुरुजी यांच्या 'रामाचा शेला' कादंबरीमधील पात्रे यांची एकूणच विचार करण्याची पध्दत, वर्तणूक व त्यांचे कार्य यामध्ये खूपच साम्य दिसते.

**संदर्भ**

१. साने गुरुजी ,रामाचा शेला,कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पहिली आवृत्ती १९४४,पृष्ठ १५
२. साने गुरुजी ,रामाचा शेला,कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पहिली आवृत्ती १९४४,पृष्ठ १६,१७
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे भाग - १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. २००२, पृष्ठ ६०
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे भाग - १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. २००२, पृष्ठ २८१,२८४
५. साने गुरुजी,रामाचा शेला,कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पहिली आवृत्ती १९४४,पृष्ठ १८४,१८५
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे भाग - १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. २००२, पृष्ठ ३०२
७. साने गुरुजी, रामाचा शेला ,कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पहिली आवृत्ती १९४४, पृष्ठ१७०,१७१
८. संपा.अरुण कांबळे व इतर - मराठी वैचारिक गद्य, प्रतिमा प्रकाशन, पृष्ठ ९९, १०४, १०५
९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे भाग - १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र - साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. २००२, पृष्ठ ४७६
१०. संपा.अरुण कांबळे व इतर - मराठी वैचारिक गद्य, प्रतिमा प्रकाशन, पृष्ठ ९९,१०४,१०५,१०६
११. साने गुरुजी , रामाचा शेला , कॉन्टिनेन्ट प्रकाशन, पहिली आवृत्ती १९४४, पृष्ठ १४६